10 NOV 1987

विषय : ग्रामीण भागातील ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग, शेतावर जाण्याचे पायमार्ग गाडीमार्ग याबाबत नकाशे अद्ययावत ठेवून त्यावरील अतिक्रमण होणार नाही याबद्दल करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन,
क्र : भूमापन–१०८६/६८/४९६६/ ल–१,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२,
दिनांक : 4 NOV 1987

पहा : १] शासनाकडील महसूल व वन विभाग क्र. ठराव क्र. १/प्र. क्र. ४९७७/ल–१ दिनांक ९.१०.१९८६ व १८.११.१९८६.
२] शासनाकडील, महसूल व वन विभाग पत्र क्र. भूमापन–१०८६/६८/४९६६/ ल–१, दिनांक २७.११.१९८६.
३] महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग निर्णय क्र. व्हीपीएम–१०८६/प्र.क्र. २२१३/२२, दिनांक २२.१०.८६.

## शासन निर्णय

ग्रामीण विभागात उपयोगात असलेले विविध प्रकारचे रस्ते, गाडीवाटा, पाऊलवाटा यांचे प्रकार खाली दिल्याप्रमाणे आहेत :

१] ग्रामीण रस्ते [एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे]
२] हद्दीचे ग्रामीण रस्ते [एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे]
३] ग्रामीण गाडीमार्ग [पोटखराब] [एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे]
४] पायमार्ग [पोटखराब] [एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे]
५] शेतावर जाण्याचे पायमार्ग व गाडीमार्ग.

२. राज्यात ज्यावेळी भूमापनाचे काम पूर्ण करून ग्राम नकाशे तयार करण्यात आले त्यावेळी प्रचलित असलेल्या वरील अ.नं. १ ते २ मध्ये नमूद केलेले रस्ते मूळ भूमापनाचे नकाशामध्ये मोजणी करून दाखविलेले आहेत. वर नमूद केलेले अ.नं. १ ते २ बहुतांश रस्ते हे हद्दीचे रस्ते म्हणून दाखल केलेले असून ते भरीव हद्दीनी नकाशात दाखविले आहेत व ह्या रस्त्यांची जमीन कोणत्याही भूमापन क्रमांकामध्ये [लगत भूमापन क्रमांकात] समाविष्ट केलेली नाही अशा रस्त्यांची रुंदी एकसारखी नसून वेगवेगळी आहे व ती त्या वेळी मोजली असून ती भूमि अभिलेखात नमूद केली आहे.

३. अ.क्र. ३ चे रस्ते गावचे नकाशात तुटक दुबार रेषेने दाखविलेले आहेत. अशा रस्त्याचे क्षेत्र ते ज्या भूमापन क्रमांकातून जात आहेत त्या भूमापन क्रमांकात समाविष्ट आहे व अशा रस्त्यांची रुंदी १६½ ते २१ फूट पर्यंत धरलेली असून त्याच्या तपशीलात [illegible] पत्रकमध्ये पोटखराब क्षेत्राचा विचार करताना प्रतिबुकामध्ये नमूद केलेला आहे.

कृ.मा.प.

४. अ. क्र. ४ चे पायमार्ग [illegible]
आहेत व अशा मार्गाचे क्षेत्र सदर मार्ग ज्या भूमापन क्रमांकातून जात आहे त्या भूमापन क्रमांकात समाविष्ट आहे व अशा पायमार्गाची रुंदी ८ १/४ फूट असून त्याप्रमाणे पोटखराब सदर भूमापन क्रमांकात दिलेले आहे. जे मार्ग पोटखाराब आहेत असे मार्ग बंद झालेस त्या धारकांना बंद पडलेल्या मार्गाची जमीन रस्त्याचे हक्क जिल्हाधिकारी यांनी कमी केले नंतर परत जमीन कसण्यास मागण्याचा हक्क आहे.

५. अ. क्र. ५ चे प्रकारचे मार्ग हे शेतावर मशागतीस जाण्याचे, शेतमालाचे ने-आण करण्याचे मार्ग आहेत. अशा मार्गाची नोंद भूमापनाचे वेळी भूमि अभिलेखात केलेली नाही. तथापि, अशा रस्त्याचे हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास त्याबाबत चौकशी करुन निर्णय देण्याचे अधिकार महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ कलम १४३ अन्वये तहसिलदार यांना देण्यात आलेले आहेत. सबब, अशा शेतावर जाणेचे मार्गाचे हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास संबंधितांना तहसिलदार यांचेकडे अर्ज करुन दाद मागता येईल. अशा शेतावर जाणाऱ्या मार्गाची भूमापनाचेवेळी मोजणी केलेली नसल्यामुळे अशा रस्त्यांचे-बाबत भूमापन अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे अशा रस्त्यांची मोजणी भूमि अभिलेख विभागाकडून करता येणार नाहीत. व त्यांच्या हद्दी निश्चित करुन देता येणार नाहीत. शेतावर जाण्यायेण्यासाठी असलेले मार्गाची मोजणी करुन नकाशात ते दाखविण्याबाबत मोजणीचे प्रचलित नियमात तरतूद नाही. तसेच, कलम १४३ मध्ये सदर कामी केलेली तरतुद विचारात घेता असे रस्ते मोजण्याची मुळीच आवश्यकता नाही.

६. वर नमूद केलेले अ. नं. १ ते ३ हया वर्गात नमूद केलेले रस्ते हे जमीन महसूल कायदा कलम २० मधील तरतुदीनुसार शासनाचे मालकीचे आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ कलम १४२ व महाराष्ट्र जमीन महसूल हद्दी व हद्दीच्या निशाण्या नियम १९६९ मधील नियम १०(१) मधील परंतुकमध्ये नमूद केल्या-नुसार ज्या भूमापन क्रमांकाचे लगत शासनाच्या जमिनी आहेत अशा जमिनींचे हद्दीचे निशाण्याचे परिरक्षण व दुरुस्तीची जबाबदारी ही कायद्यातील तरतुदी-प्रमाणे लगतचे भूमापन क्रमांकाचे धारकावर ठेवलेली आहे. अशा परिस्थितीत भूमापनाचे सीमेवरील हद्दी व हद्दींच्या निशाण्या नष्ट करुन जर एकादे धारकाने रस्त्यात अतिक्रमण केले असेल तर महसूल अधिकाऱ्यांनी अशा अतिक्रमण करणाऱ्या धारकावर महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम १४२, ५३ मधील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कारवाई तातडीने करणे जरुर आहे व अतिक्रमण काढून टाकणे आवश्यक आहे.

ग्रामीण रस्ते यांची देखभाल व परिरक्षणाचे काम हे जिल्हा परिषदांचे बांधकाम विभागाकडून केले जाते. व हद्दीचे रस्ते [पाणंदा वगैरे] यांची देखभाल व परिरक्षण ही कामे ग्रामपंचायतीचे अखत्यारित येतात. जिल्हा परिषदा व ग्रामपंचायत रस्त्यावरील अतिक्रमण आढळून आल्यास ते काढून टाकण्याचे अधिकार मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ चे कलम ५३[२] अन्वये ग्रामपंचायतींना प्रदान केलेले आहेत व कलम ५३[२अ] अन्वये अशा प्रकारची अतिक्रमणे हटविण्याची कारवाई ग्रामपंचायतीने न केल्यास अशा प्रकरणी अतिक्रमणे हटविण्याचे अधिकार ते जिल्हाधिकारी यांना देणेत आलेले आहे. त्यानुसार जिल्हाधिका-यांना कारवाई करणे शक्य आहे.

सर्व जिल्हाधिका-यांना वर नमूद केलेल्या ५ प्रकारच्या ग्रामीण रस्त्यांवर कोणत्याही त-हेचे अतिक्रमण होणार नाही व त्यामुळे ग्रामीण विभागातील होणा-या अतिक्रमणांवर जरूर ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. तहसिलदार यांना त्यांच्या तालुक्यातील अशा त-हेच्या ग्रामीण रस्त्यांवर अतिक्रमण आढळून आल्यास त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्याबाबत जबाबदारी सोपविण्यात यावी.

९. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. व्हीपीएम-१०८६/२२१३/२२, दिनांक २२.१०.१९८६ प्रमाणे जिल्हा परिषदा किंवा ग्रामपंचायत समित्या यांच्याकडून नवीन ग्रामीण रस्ते, पाऊलवाटा याबाबतची माहिती प्राप्त होताच त्या गावच्या नकाशावर दाखविण्यासाठी जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख यांनी जरुर ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१०. या सूचनेची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाईल याची सर्वांनी तजवीज ठेवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[वि. बा. जाधव]
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

प्रत,